# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी

## (मार्च १९७३, वर्ष ४६वे, अंक ३, क्रमांक ५४३)

या अंकात संपादकीय धरून तेरा लेख आहेत. संपादकीय – मध्ये तत्कालीन दुष्काळाच्या समस्येचा ऊहापोह आहे.

दुष्काळी कामांची आखणी, नियोजन व सुरुवात याबरोबरच, सर्वच स्तरावरील टंचाईमुळे वीज कपात, समारंभांमध्ये जेवणावळींवरील निर्बंधे, आदींचा उल्लेख आहे.

या बाबी समाजाने स्वीकारल्या असून समाजात कर्तव्याची जाणीव व शिस्तप्रियता वाढेल, अशी आशाही व्यक्त केलेली आहे. पुढील परिस्थिती अधिक गंभीर असेल, म्हणून शासनाला सर्वतोपरी सहाय्य करावे, असे आवाहन आहे.

दोन महाराष्ट्रीय वैज्ञानिकांचा सत्कार करण्याची नवी पद्धत सुरू करत असल्याचाही उल्लेख आहे.

पहिला लेख श्री. शं. ल. चोरघडे यांचा, भारतीय द्वीपकल्पातील भूकंप या विषयावर आहे. या पार्श्वभूमीवर, अलीकडच्या तुर्कस्तान सीरिया सीमेवरील भूकंपामुळे झालेली हानी व निसर्गापुढील आपली हतबलता, यात पन्नास वर्षात काहीच बदल झालेला नाही, हे जाणवते. भूकंपाची पूर्वसूचना मिळण्याचे विज्ञान तेव्हाही नव्हते व आजही नाही. दुसरा लेख मूलद्रव्यांची आवर्त सारणी हा श्री. स. मं. ठाकूर यांचा आहे. दुष्काळ हटाव या डॉक्टर जामखेडकर यांचे लेखात दुष्काळामुळे भूकबळी व रोगराई समस्या उद्भवते, असे म्हटले आहे. आज भूकबळी नाहीत पण कुपोषण आहे. त्यावरही मात करणे हे आपले प्राथमिक ध्येय आहे.

वाचकांच्या पत्रव्यवहारावर आधारित सा. न. वि. वि. सदर श्री. गुंजीकर यांनी लिहिले आहे.

तीन अंकी संख्येचा वर्ग काढण्याची सोपी पद्धत श्री. डोंगरे यांनी दिली आहे.

✻ आकाशाशी जडले नाते हा प्राध्यापक केसकर यांचा लेख आहे. योगायोग म्हणजे याच नावाचे पुस्तक (डॉक्टर जयंत नारळीकर १९९८) बरोबर पंचवीस वर्षानंतर निघाले व विज्ञानाचा मानदंड झाले. डॉक्टर जयंत नारळीकरांचे वडील, प्राध्यापक वि. वा. नारळीकर हे त्या वेळच्या सृष्टिज्ञान सल्लागार मंडळात होते, हा दुसरा योगायोग. प्राण्यांची आयुर्मर्यादा हा प्राध्यापक डोंगरे यांचा लेख आहे. यात मानवी आयुर्मर्यादा व प्राण्यांची आयुर्मर्यादा यावर रंजक टिप्पणी आहे.

मानाचा मुजरा हा लेख प्राध्यापक प्रभाकर सोवनी यांनी लिहिलेला आहे यात मार्च महिन्यात जन्मलेल्या व विज्ञानाला वेगळे वळण देणाऱ्या शास्त्रज्ञांना मुजरा आहे.

विज्ञान रंजन कथा अंतर्गत अपघात या प्राध्यापक निरंजन घाटे यांच्या कथेचा सारांश त्यांचेच शब्दात आहे.

विज्ञान चित्रकथा अंतर्गत माशावरील जिवोपयोगी हा प्राध्यापक राजे यांचा लेख, सूक्ष्मजीव व रोग यांची जाणीव करून देतात.

होम सायन्स – एक उपयुक्त अभ्यासक्रम हा शालिनी भिडे यांचा लेख, या अभ्यासक्रमाविषयीचे तत्कालीन गैरसमज दूर करणारा आहे.

श्रद्धांजली सदरात प्राध्यापक डॉक्टर करंदीकर यांचे साठी प्रार्थना आहे.

**विज्ञान वार्ताहर**